डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नित
हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा व्दारा संचलित

# शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण

ता. कळंब जि. उस्मानाबाद

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## वार्षिक कार्यक्रम अहवाल

कार्यक्रमाधिकारी

प्रा.अडसुळे एस. पी.

प्राचार्य

डॉ बिराजदार जी. डी.

सहकार्यक्रमाधिकारी

डॉ. खोंड एस. व्हि.

## सन 2020-2021

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नित

हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा व्दारा संचलित

**शरदचंद्र महाविद्यालय,शिराढोण**

ता.कळंब जि.उस्मानाबाद

**राष्ट्रीय सेवा योजना**

**वार्षिक कार्यक्रम अहवाल – २०२०-२१**

मी राष्ट्रीय सेवा योजना या विभागाचा प्रमुख म्हणुन आपल्या समोर वार्षिक नियमित कार्यक्रम अहवाल सादर करीत आहे.

प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** यांच्या नेतृत्वाखाली व **डॉ.साजेद चाऊस** यांच्या मार्गदर्शना-खाली विद्यापीठाने घेण्यात सांगितलेले नियमित कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात व महाविद्यालय परिसरात घेण्यात आले ते पुढील प्रमाणे.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.२१ जून २०२० वार-शुक्रवार या दिवशी **आंतरराष्ट्रीय योग दिवस** साजरा करण्यात आला.आंतरराष्ट्रीय योगदिवस हा दरवर्षी २१जून रोजी जगभरात साजरा केला जातो.संयूक्त राष्ट्रांनी याला मान्यता दिली आहे.भारतीय संस्कृती मध्ये योग साधनेला अनन्य साधारण महत्व आहे.योगसुत्र व्दारे मानवाच्या शारिरीक,मानसीक व बैध्दिक विकासाची उन्नती साधता येते.येगाचे महत्व ओळखून २१ जून २०२० रोजी योगशिबीराचे आयोजन करण्यात आले.सकाळी ठिक ०७:०० वाजता सर्व प्राध्यापक व विद्यार्थी या शिबीरास उपस्थित होते.या शिबीरामध्ये प्रत्यक्ष कृतीव्दारे विविध योग साधनाचे महत्व पटवून देण्यात आले.योगाचे महत्व या विषयावर **डॉ.साजेद चाऊस** सर यांनी मार्गदर्शन केले कळंब येथील  योगगुरु **श्री.संजय लक्ष्मीकांत खेडकर यांनी** योगाचे सादरीकरण करुण सर्वांना योगाचे महत्व सांगितले.या वेळी प्राध्यापक व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.शेवटी या सर्वांचे सहकार्यक्रम अधिकारी **डॉ.खोंड एस.व्ही.** यांनी उपस्थित सर्वांचे आभार मांनले.

छत्रपती **शाहु महाराज** यांची जयंती दि. २६ जून २०२० वार बुधवार शरदचंद्र महाविद्यालयात साजरी करण्यात आली. शाहु महाराज सुधारणावादी समाजसुधारक होते शाहु महाराजांनी बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला.स्त्री शिक्षणाचा प्रचार व्हावा म्हणुन त्यांनी राजाज्ञा काढली व कोल्हापुर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले.अस्पृश्यता निवारणामध्ये मोलाचे कार्य केले अशा महापुरुषांची जयंती राष्ट्रीय सेवायोजना विभागाच्या वतिने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे **प्राचार्य. जी. डी. बिराजदार** हे होते कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे **डॉ.साजेद चाऊस** सर व **डॉ.अलटे शशिकांत** हे उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्रसंचालन **डॉ.खोंड.एस.व्ही.यांनी** केले. आभार प्रदर्शन **प्रा.अडसुळे एस.पी.यांनी** मांनले.

दि. १ ते ७ जुलै या कालावधीत वन सप्ताह साजरा करण्यात आला.या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** उपस्थित होते प्रमुख उपस्थिती **डॉ.साजेद चाऊस** सर, **हरित सेना प्रमुख डॉ.शिरमाळे एम.बी. व पालक गोरोबा कटकुरे. रा.से.यो.प्रमुख,प्रा.अडसुळे.एस.पी. व डॉ.खोंड.एस.व्ही.** यांच्या उपस्थितीत महाविद्यालय परिसरात शासनाच्या वृक्षलागवडीस हातभार लावण्यासाठी वृक्ष लागवड करण्यात आली.आपल्या जीवनात वृक्षांचे महत्व संवर्धन जतन या विषयी प्रमुख पाहुण्यांनी आपले विचार प्रकट केले या वेळी प्राध्यापक व संयसेवक मोठ्या संखेने वृक्षलागवड करण्यासाठी उपस्थित होते.या सर्वाचे **डॉ.खोंड.एस.व्ही.** यांनी आभार व्यक्त केले.

दि. १३/०७/२०२० वार शनिवार रोजी **राष्ट्रीय तंबाखु मुक्त अभियान** राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबवण्यात आले.तंबाखु जन्य पदार्थांचे सेवन न करण्याचे शपथ **प्रा.आडसुळे एस.पी.** यांनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना शपथ देऊन आम्ली पदार्थ सेवन न करण्याची शपथ दिली.या वेळी **डॉ.सय्यद ए.फ.,डॉ.आलटे एस.एम.** विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयात दि. १ ऑगस्ट रोजी लोकशाहिर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक स्मृती दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** सर हे होते.तर प्रमुख पाहुणे **प्रा.ईश्वर राठोड** (समाजशास्त्र विभाग कळंब). **डॉ.साजेद चाऊस** सर हे उपस्थित होते.प्रमुख पाहुण्यांनी लोकशाहिर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन करुण लोकमान्य टिळक आणि आण्याभाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदान यावर भर देण्यात आला.उपस्थित प्राध्यापक व संयसेवक यांचे **प्रा.अडसुळे एस.पी.** यांनी आभार व्यक्त केले.

१५ ऑगस्ट २०२० रोजी महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** यांच्या हस्ते ध्वजारोहन करुण्यात आले ध्वजारोहन करुण रक्षाबंधनाचा कार्यक्रम प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.या वेळी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व सर्व विद्यार्थी यांना विद्यार्थीनी राख्याबांधून हा सण साजरा करण्यात आला.

दि. २३ ऑगस्ट २०२० रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद विद्यापीठाचा **६२ वा वर्धापन दिन** महाविद्यालयात साजरा करण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे मराठवाडा विभागातील एक प्रमुख विद्यापीठ आहे.सदरील विद्यापीठाची स्थापना २३ ऑगस्ट १९५८ रोजी झाली आहे.सकाळी ०८:०५ वाजता विद्यापीठाच्या ध्वजाचे ध्वजारोहन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** सर यांच्या हस्ते झाले.

फिट इंडिया दि. २९ ऑगस्ट २०२० रोजी वार गुरुवार रोजी राष्ट्रीय सेवा योजना या विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जे.डी.बिराजदार** सर प्रमुख पाहुणे म्हणुन **डॉ.पी.एल.भंवर सर, डॉ.बालकृष्ण भंवर सर, डॉ.गपाट सर, मोहीते तात्या, डॉ.साजेद चाऊस सर** शारिरीक कसरतीचे महत्व या वेळी प्रमुख पाहुन्यांनी अधोरेखीत करुण शरिर फिट ठेवण्याची कला सांगितली.उत्तम आरोग्या साठी फिट शरीर असावे असे अवगत केले.सुत्रसंचलन **डॉ.खोंड एस.व्ही.** यांनी केले तर आभार प्रदर्शन **प्रा.अडसुळे एस.पी.** यांनी केले.

५ सप्टेंबर २०२० रोजी **शिक्षक दिन** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** प्रमुख पाहुणे म्हणुन **डॉ.मधुकर मुंडे** (मा.प्राचार्य), **डॉ.अकबरलाला सय्द, डॉ.साजेद चाऊस** सर हे होते. प्रमुख पाहुण्यांनी शिक्षकांना विशेष सम्मन देण्यासाठी शिक्षकदिन साजरा केला जातो भारताचे मा.राष्ट्रपती **डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन** यांचा जन्म दिवस ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिनाच्या स्वरुपात साजरा करण्यात येतो.या दिनाचे औचित्य साधुन महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले.काही विद्यार्थ्यांनी शिक्षकाविषयी आपले मनोगत व्यक्त केले. **डॉ.खोंड.एस.व्ही.** यांनी सुत्रसंचलन केले **प्रा.अडसुळे एस.पी.** यांनी आभारप्रदर्शन केले.

१७ सप्टेंबर २०२० वार मंगळवार रोजी **मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन** साजरा करण्यात आला.सकाळी ०८:०५ वाजता महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.या प्रसंगी मराठवाडा मुक्तीसंग्रामा मध्ये योगदान देणाऱ्या थोर पुरुषांमध्ये **स्वामी रामानंद**

तिर्थ, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, देवीसिंग चव्हाण इत्यादी मराठवाड्यातील स्वातंत्र्य सेनांनी विषयी महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** सर यांनी माहीती दिली. **डॉ.अन्टे एस.एम.** व डॉ.शिरमाळे एम.बी. हे मंचावर उपस्थित होते.सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.उपस्थितांचे प्रा.अडसुळे एस.पी. यांनी आभार व्यक्त केले.

२४ ते ३० सप्टेंबर २०२० (सप्ताह) **राष्ट्रीय सेवा योजना दिन** महाविद्यालयात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** सर तर प्रमुख पाहुणे म्हणून **डॉ.ढळचे एस.एम** हे उपस्थित होते.त्यांनी राष्ट्रीय सेवायोजनेचे उदिष्टये कार्य करण्याची पध्दत व महत्व विशद केले.त्यानंतर **महाविद्यालयाचे** प्राचार्य यांनी राष्ट्राच्या विकासात युवकांचे महत्व या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.नंतर **महाविद्यालय** परिसरात स्वच्छता उपक्रम राबवुन **प्रा.अडसुळे एस.पी व डॉ.खोंड** एस.व्ही यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

२ ते १० (गांधी सप्ताह) ऑक्टोंबर २०२० **राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती** कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** सर प्रमुख पाहुणे **डॉ.घोलप के.जी., डॉ.सय्यद ए.एफ.** हे मंचावर उपस्थित होते.या थोर महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरवात केली.प्रमुख पाहुण्यांनी मोहनदास करमचंद गांधी हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते होते.अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी महात्मा गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले त्यांचा जन्म दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणुन साजरा केला जातो.डॉ.बिराजदार **जी.डी.** यांनी महात्मा गांधी यांच्या सत्य,अहिंसा आणि सत्याग्रह यांचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.सुत्रसंचालन **डॉ.खोंड एस.व्ही.** यांनी तर आभार प्रदर्शन **प्रा.अडसुळे एस.पी.** यांनी केले.

४ ऑक्टोंबर २०२० रोजी **मतदार जनजागृती अभियान** या कार्यक्रमासाठी अध्यक्ष महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ.जी.डी.बिराजदार** सर प्रमुख पाहुणे **धावारे एल.आर.(विस्तार** अधिकारी तथा स्विप सदस्य),सुनील **अहिरे** सर (ओजस मुख्याध्यापक,शिराढोण) प्राचार्य **एम.एम.शेख** (के.एन.ज्यु.कॉलेज,शिराढोण) हे उपस्थित होते.प्रमुख पाहुण्यांनी सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना मतदान करण्याविषयी शपथ देऊन मतदानाचे महत्व विषद केले.मतदान करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे.हे सर्व मतदारांना जनजागृतीच्या माध्यमातुन निदर्शनास आणुन देण्याचे काम सर्वांनी करावे असे या प्रसंगी उपस्थित सर्वांनाच सांगण्यात आले.

३१ आक्टोंबर २०२० **सरदार वल्लभभाई पटेल** यांची जयंती **राष्ट्रीय एकात्मता दिन** म्हणुन साजरी करण्यात आली. वल्लभ भाई पटेल हे राजकीय व सामाजिक नेते होते.देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात व मराठवाडा मुक्ती संग्रामात मोठे योगदान दिले आहे.त्यांना भारतीय महिलांनी सरदार या पदवीने संबोधीत केले **डॉ.जी.डी.बिराजदार** यांनी पटेल यांच्या जीवनावर प्रकाश टाकला या वेळी महाविद्यालयातील सर्व स्टाप व विद्यार्थी उपस्थित होते.उपस्थित सर्वांचे **प्रा. अडसुळे एस.पी.** यांनी आभार व्यक्त केले.

२६ नोव्हेंबर २०२० वार मंगळवार रोजी **संविधान दिन** साजरा करण्यात आला.डॉ.घोलप **के.जी.** यांनी संविधानाच्या प्रास्तविकाचे वाचन सर्व स्टाप व विद्यार्थी यांच्या समोर करण्यात आले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वा खाली भारताच्या राज्यघटनेच्या निर्मीतीसाठी मसुदा समिती स्थापन झाली अनेक बैठका व चर्चे नंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान समितीने स्वीकारला या दिनाचे महत्व ओळखुन २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणुन साजरा केला जातो.हे त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर सांगितले.

२८ नोव्हेंबर २०२० रोजी महाविद्यालयात **महात्मा फुले** यांची **पुण्यतिथी** साजरी करण्यात आली.त्यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी **प्रा.अडसुळे एस.पी, डॉ.खोंड एस.व्ही, डॉ.सय्यद ए.एफ, डॉ.घोलप के.जी,** सर्व स्टाप व विद्यार्थी उपस्थित होते.

१ डिसेंबर २०२० रोजी महाविद्यालयात **जागतिक एड्स दिन** साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन **डॉ.अत्तार ए.एच.**तर प्रमुख पाहुणे म्हणुन **प्रा.गंभीरे पी.यु.** हे उपस्थित होते.

त्यांनी आपल्या मार्गदर्शनात एड्स हा संसर्गजन्य आजार नाही.त्या साठी आपण एड्सग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे गेले पाहीजे आणि एड्स या रोगाच्या नायनाटासाठी जनजागृती करण्याची आवश्यकता आहे असे मत व्यक्त केले. उपस्थितांचे **डॉ.खोंड एस.व्ही.** यांनी आभार व्यक्त केले.

६ डिसेंबर २०२० रोजी महाविद्यालयात **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वान दिन** साजरा करण्यात आला.या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार सर,** तेरणा साप्ताहिकाचे संपादक **श्री.खिचडे सर,** सर्व स्टाप व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेचे पुष्पहार अर्पण करुण श्रंध्दांजली वाहण्यात आली.

२० डिसेंबर २०२० रोजी महाविद्यालयात **संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी** साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** सर, **डॉ. फारुख तांबोळी सर** व सर्व स्टाप आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले.डॉ.खोंड **एस.व्ही.यांनी** स्वच्छतेचे महत्व विषद केले.

३ जानेवारी २०२१ रोजी महाविद्यालयात **सावित्रीबाई फुले जयंती** साजरी करण्यात आली.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार, डॉ.घोलप के.जी, डॉ.सय्यद ए.एफ,रा.से.यो.प्रमुख प्रा.अडसुळे एस.पी.व डॉ.खोंड एस.व्ही.** व सर्व स्टाप व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले.

२६ जानेवारी २०२१ वार रविवार रोजी महाविद्यालयात **प्रजासत्ताक दिन** साजरा करण्यात आला. सकाळी ठिक ८:०५ वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ.जी.डी.बिराजदार** सर यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या वेळी **डॉ.सय्यद आर.आर.** व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

वरील सर्व वार्षीक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. जी. डी. बिराजदार,उपप्राचार्य डॉ.साजेद चाऊस** यांचे सतत योगदान व कार्यक्रम घेण्यासाठी प्रोत्साहन राहिले.तसेच सहकार्यक्रमाधिकारी **डॉ.खोंड एस.व्ही.** व महाविद्यालयातील माझे सर्व सहकारी प्राध्यापक मित्र व कर्मचारी यांनी मला वेळोवेळी सहकार्य केले त्या बद्दल त्यांचे मी कार्यक्रमाधिकारी या नात्याने सर्वांचे धन्यवाद मांनतो त्याच बरोबर माझे सर्व स्वयंसेवक प्रत्येंक कार्यक्रमात मोठया उत्सहाने सहभाग नोंदविला आणि कार्यक्रम यशस्वी पार पाडला त्या बद्दल त्यांचे देखील धन्यवाद मानतो मला पुर्ण खात्री आहे.या कार्यक्रमाच्या माध्यमातून माझा स्वंयसेवक हा सामाजिक कार्यकर्ता, देशाचा एक चांगला नागरिक म्हणुन नक्की पुढे येईल अशी आशा मी बाळगतो.

धन्यवाद...!

**कार्यमाधिकारी**

**प्रा.अडसुळे एस.पी.**
N.S.S. Prog. Officer
Sharadchandra Mahavidyalay,Shiradhon
Tq.Kallamb,Dist.Osmanabad


**प्राचार्य**


**डॉ.जी.डी.बिराजदार**
Principal
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon, Tq. Kallam






Principal
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon, Tq. Kallam




Principal
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon, Tq. Kallam








Principal
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon, Ta. Kallam






Principal







Principal
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon, Tq. Kallam